PAGE No.
DATE



॥ स्वर्ग ॥

स्वर्ग स्वर्ग, तो आहे का हो खरंच
प्रत्येकाच्या कल्पनेत ऐकलय मी बरच
प्रत्यक्षात तो कुणी नाही पाहिला
पण कधी ना कधी सर्वांनी अनुभवला ॥१॥

स्वर्ग म्हणजे काश्मिर, पाणी निळेशार
बर्फाचे डोंगर आणि हवा थंडगार
स्वर्ग म्हणजे चमचमीत रुचकर भोजन
आजी, आईच्या हातचे मसालेदार व्यंजन ॥२॥

मद्यपीला मद्य, धनिकाला धन
तरुणाला सौंदर्य, भुकेला अन्नाचा कण
चोराला घबाड, तर राजकारण्याला सत्ता
बिचाऱ्या कारकुनाला टेबलाखालून भत्ता ॥३॥

अभावातून उपलब्धीकडे वाटचाल जेव्हा होते
स्वर्गाचे द्वार, मला वाटते तेव्हाच खुले होते
उघड्यावरच्या माणसाला झोपडी स्वर्ग भासते
बंदिवान कैद्याला आकाशच स्वर्ग दिसते ॥४॥

स्वर्ग नरक सारे मनाचे खेळ
सुदृढ शरीराला द्या सुस्थिर मनाचा मेळ
जाऊ तिथे निर्माण करू हवा तसा स्वर्ग
कल्पनेला मात्र दाखवावा उद्यमतेचा मार्ग ॥५॥

धनश्री श्रेयस यादव.
९८२३७८२६०९

व्हिडिओ पहा